# पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर

## प्रेस नोट दि.३१/०८/१७

## दि.३०/०८/१७ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

### भाग-१ ते ५ चे गुन्हे

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | वारजे पो स्टे ३३७/१७,भादविक ३८० |
| **फिर्यादी** | अश्विनी चांदकर,वय-३०,रा.वारजे,पुणे |
| **आरोपी** | अज्ञात |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.३०/८/१७ रोजी ११/३० ते १२/०० वा.चे दरम्यान युक्ता अपार्टमेंट,वारजे,पुणे येथे |
| **तपशिल** | कोणीतरी अज्ञात इसमाने फिर्यादी यांचे राहते घराचे उघडया खिडकीतुन आत प्रवेश करुन घरातील सोन्या-चांदीचे दागिने असा एकुण १,८३,०००/- रु किमतीचा ऐवज चोरी करून नेला. |
| **त.अंमलदार** | म.पो.उप.निरी. त्र्यबंके ९८६०३७०१५१ |

२

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | चिंचवड पो स्टे २३१/१७,भादविक ४५४,३८० |
| **फिर्यादी** | राजेश सावंत,वय-३४,रा.चिंचवड,पुणे |
| **आरोपी** | अज्ञात |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२९/०८/१७ रोजी सकाळी ०८/०० वा.ते २२/३० वा. एम/१२,गावडे कुणाल गार्डन,चौथा मजला,लिंक रोड,चिंचवड,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांचा राहता फ्लॅट कुलुप लावुन बंद असताना,कोणीतरी अज्ञात इसमाने त्यांचे राहते घराचे मुख्य दरवाजाचे कुलुप कशाचे तरी सहायाने उचकटुन,त्यावाटे आंत प्रवेश करून,बेडरूम मधील कपाटातील रोख ४ लाख रूपये व सोन्या-चांदीचे दागिने असा एकुण ७ लाख ५५ हजार रू किमतीचा ऐवज घरफोडी चोरी करून नेला. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. राठोड ९३७०९४२१७५ |

३

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | पिंपरी पो स्टे ४९६/१७,भादविक १४३,१४७,१४९,३२४,क्रिमीनल लॉ अमेंडमेंड कायदा क.३,७ |
| **फिर्यादी** | राहुल भिसे,वय-२२ वर्षे,रा.गांधीनगर,पिंपरी,पुणे |
| **आरोपी** | १.दिनेश शिंगाडे,वय-२५ २.सुनिल तेलकर,वय-२५ ३.किरण गुरखा,वय-२५ ४.सुरेश धोत्रे,वय-२४ ५.आकाश बाबावले,वय-१९,सर्व रा.खराळवाडी,पिपंरी,पुणे (अटक) ६.एक विधीसंघर्षीत बालक,वय-१६ वर्षे (ताब्यात) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२९/०८/२०१७ रोजी २३/३० वा.कामगार भवन जवळील रोडवर गांधीनगर पिपंरी,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांचा भाऊ संजय भिसे यास यातील नमुद इसम दिनेश शिंगाडे,रा. खराळवाडी,पिपंरी,पुणे हा मारहाण करीत होता. फिर्यादी हे त्यास सोडविण्यासाठी गेले असता दिनेश शिंगाडे याने फिर्यादी यांचे डोक्यात व संजय भिसे याचे तोंडावर सिमेंटच्या गट्टुने मारुन जखमी केले आहे. तसेच भांडणे सोडविण्यासाठी आलेल्या काल्या बोचकुरे यास सुनिल तेलकर, किरण गुरखा, सुरेश धोत्रे, कुणाल वेताळ, आकाश बाबावले यांनी हाताने,लाथा-बुक्यांनी व सिंमेटच्या गट्टुने मारहाण करुन जखमी केले आहे. तसेच सदर भागात या इसमांनी आम्ही या भागातील दादा असुन,आमच्या मध्ये कोणी आलेतर त्याचेकडे पाहुन घेवु असे मोठ-मोठयाने आरडा-ओरडा करीत होते. त्यामुळे सदर भागात राहणारे नागरीकांनी त्यांचे दहशतीला घाबरुन सैरावैरा पळुन आप-आपले घराचे दरवाजे बंद करुन घेतले आहेत. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. घुगे ९४०३०३१८८९ |

४

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | पिंपरी पो स्टे ४९७/१७,भादविक ३२३,३२४,५०४, क्रिमीनल लॉ.अमेंडमेंड का.३,७ |
| **फिर्यादी** | सुरेश धोत्रे,वय-१८ वर्षे,रा.गांधीनगर,पिंपरी,पुणे |
| **आरोपी** | १.राहुल सुर्वे,वय-२१,रा.गांधीनगर,पिंपरी,पुणे २.सुरेश बोचकुरे,वय-२३,रा.सदर ३.संजय भिसे,वय-२५,रा.सदर ४.राहुल भिसे,वय-२२,रा.सदर (अटक) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२९/०८/२०१७ रोजी २३/३० वा.कामगार भवन जवळील रस्त्यावर गांधीनगर पिंपरी,पुणे |
| **तपशिल** | यातील फिर्यादीची यांचा मित्र आकाश विजय बाबावले हा लघुशंकेसाठी जात असताना त्या ठिकाणी यातील नमुद इसमांनी अकाश बाबावले यास हाताने मारहाण करीत होते. त्यावेळी फिर्यादी हे त्यांची भांडणे सोडविण्यासाठी गेले असता,संजय भिसे याने फिर्यादी व आकाश बाबावले यांचे डोक्यात पाठिमागुन दगड मारुन त्यांना जखमी केले. तसेच आकाश यास माझ्याकडे काय बघतोस असे म्हणुन शिवीगाळ करुन,मोठ-मोठयाने आराडा-ओरडा करुन इथे कोणाला जास्त मस्ती आली आहे. आम्ही त्याची मस्ती उतरवु,आम्ही येथील दादा आहोत,आमच्या मध्ये जर कोणी आलातर,त्याचेकडे पाहुन घेवु असे म्हणुन फिर्यादी व आकाश यास मरहाण करताना,सदर भागात राहणारे नागरीक त्यांचे दहशतीला घाबरुन सैरावैरा पळुन जावुन,त्यांनी आप-आपले दरवाजे बंद करुन घेतले आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. अंतरकर ८९७५७५३५९९ |

५

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | हडपसर पो स्टे ८५८/१७,भादविक ३२४,५०४,३४,१४३,१४७,१४८,१४९ |
| **फिर्यादी** | संतोष पठारे,वय-२६ वर्षे,रा.पांडवदंड,फुरसुंगी,पुणे |
| **आरोपी** | १.प्रविण सखाराम पठारे २.गोविंद हनुमंत पठारे ३.निलेश हनुमंत पठारे ४.अलका सखाराम पठारे ५.शंकर सखाराम पठारे ६.परी गोविंद पठारे,रा.सर्व सातदेवी मंदीरा शेजारी, पांडवदंड, फुरसुंगी,पुणे (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२९/०८/२०१७ रोजी दुपारी १३/०० वा. सातदेवी मंदीरा शेजारी,पांडवदंड,फुरसुंगी,पुणे येथील फिर्यादी यांच्या घरा समोर |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांनी त्यांचे राहते घरा समोरील ग्रामपंचायतच्या मोकळया जागे मध्ये त्यांचे बांधकाम व्यवसायाच्या लोखंडी सळया टाकल्या होत्या. त्यावेळी त्यांचे शेजारी राहणारा चुलत भाऊ प्रविण सखाराम पठारे याने फिर्यादी यांचा भाऊ प्रकाश यास लोखंडी सळया येथे का टाकल्या? असे म्हणुन शिवीगाळ चालु करुन,लोखंडी सळईने प्रकाश यांचे पाठीवर मारत असताना,फिर्यादी हे भांडणे सोडविण्यास गेले असता,गोविंद हनुमंत पठारे याने फिर्यादी यांचे डोक्यात लाकडी दांडक्याने मारून,फिर्यादी यांची आई सौ.बेबी,वय-५२ हिस निलेश पठारे याने लाकडी दांडक्याने तीच्या उजव्या हातावर मारून असे तिघांना जखमी केले आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. पुणे ९४०३१८८३१८ |

६

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | सांगवी पो स्टे ३५७/१७,भादविक ३५३,४२७,३२३,५०४ |
| **फिर्यादी** | नामदेव कावळे,वय-३४,रा.रेल्वे पोलीस वसाहत,चिखलवाडी,सांगवी,पुणे |
| **आरोपी** | रमेश हरीभाऊ वाल्हेकर,वय-३२,रा.आंबेडकर वसाहत,खडकी,पुणे (अटक) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.३०/०८/१७ रोजी ०९/२० ते ०९/३५ वा. चे दरम्यान औंध बॉडी गेट पोलीस लाईन बस स्टॉप ते सांगवी नवीन ब्रीज पुणे या दरम्यान |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे पीएमटी बसमध्ये वाहक असुन,पीएमपी बस मधील प्रवासी यातील नमुद इसम यास फिर्यादी यांनी तिकीटाचे पैसे मागितल्याचे कारणावरुन फिर्यादी यांना शिवीगाळ व हाताने मारहाण करुन,फिर्यादी हे करीत असलेल्या सरकारी कामात अडथळा निर्माण केला आहे. सदर भांडणात फिर्यादी यांचा मोबाईल व तिकीटाचे गोळा केलेले एकुण १,९००/- रु रोख पडुन गहाळ झाले आहेत. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. बागुल |

७

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | फरासखाना पो स्टे १९३/१७,भादविक ४२०,५०६ |
| **फिर्यादी** | सौ.मानसी देशपांडे,वय-४०,रा.ताडीवाला रोड,पुणे |
| **आरोपी** | माधव जोशी,रा.इंद्रप्रस्थ सोसायटी,सिंहगड रोड,पुणे (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | सन २०१५ रोजीपासुन ते सन दि.२९/०८/१७ रोजीपर्यंत कसबा पेठ येथील पोस्ट ऑफीस मध्ये |
| **तपशिल** | यातील नमुद इसम माधव जोशी याने फियादी यांना प्रति माहे ५० हजार रूपये घेवुन ५ लाख रूपये जमा करून घेवुन,त्यापैकी फिर्यादी यांना १,५०,०००/- रूपये परत केले. परंतु उर्वरित ३,५०,०००/- रूपयेची मागणी केली असता,सदर इसमाने ती रक्कम फिर्यादी यांना परत करता,त्याचे स्वतःचे फायदयाकरीता सदर रकमेचा उपयोग करून फसवणुक केली आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. नाईक ९९२३५२३६०७ |

८

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | भोसरी पो स्टे ३८४/१७,भादविक ४२०,४७१,४७३ |
| **फिर्यादी** | एक पुरूष,वय-४७ वर्ष,रा.भोसरी,पुणे |
| **आरोपी** | सौरभ सरकार,रा.भोसरी,पुणे (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२६/०७/२०१७ ते दि.२९/०८/२०१७ रोजीचे कालावधीत साई स्वंयभुत सेवा केंद्र,विज महाविद्यालय केंद्रा शेजारी,भोसरी,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील नमुद इसम सौरभ सरकार याने फिर्यादी यांचे मुलीचे जातीचे प्रमाणपत्राचा दाखला हा खरा आहे असे सांगुन,त्याबदल्यात फिर्यादी यांचेकडुन ३०,०००/- रुपये घेतले. फिर्यादी यांनी त्यांचे मुलीचे जातीचे प्रमाणपत्राचा दाखला हा जात पडताळणी समिती,पुणे यांचेकडे पाठविले असता,सदर समितीने तो मुलीचा दाखला बनावट असल्याचे सांगितले. तरी सदर इसमाने फिर्यादी यांचे मुलीचे जातीचे प्रमाणपत्रासाठी बनावट कागदपत्रे तयार करुन फसवणुक केली आहे. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी. सोमनाथ नाळे ९४२२६४४२५५ |

## दि.३०/०८/१७ रोजी ००/०० वा. ते २४/०० वा. पर्यंतचा अटक आरोपी तक्ता

| अनं | पोलीस ठाणे | कलम | आरोपीचे नांव | वय |
|---|---|---|---|---|
| १ | हिंजवडी | भादविक ४५४,३८०,५०४,५०६,३४ | बिदास गंगाधर पंडीत | ३२ |
| २ | हिंजवडी | भादविक ४५४,३८०,५०४,५०६,३४ | बालाजी गंगाधन पंडीत | २६ |
| ३ | हिंजवडी | भादविक ३०४(अ),३३६ | शिवा सोमनाथ राठोड | ३० |
| ४ | मुंढवा | भादविक ३७६,३७७,५०६ | अविनाश मोहन सपकाळे | २३ |
| ५ | वारजे | भादविक ४५४,३८०,३४ | मुकेश बबन मेने | १९ |
| ६ | वारजे | भादविक ४५४,३८०,३४ | श्रीकांत नंदकुमर झगडे | २१ |
| ७ | वारजे | भादविक ४५४,३८०,३४ | कमलेश संतोष मोकर | २९ |
| ८ | खडक | भादविक ४३५ | राजेंद्र राम काळे | ३७ |

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**